| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 12 Jan 2026 | Winter illnesses and health insurance | Maharashtra Times |

# हिवाळ्यातील आजार अन् आरोग्य विमा




अमरनाथ सक्सेना

Matawealth@timesofindia.com


**हिवाळा सुरू होताच संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढताना दिसते. अनेक वेळा हे आजार गंभीर स्वरूप धारण करतात. श्वसनाचे आजार, फ्लू, न्यूमोनिया; तसेच जुने आजार थंडीमुळे बळावण्याचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत आरोग्याची काळजी घेणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच आर्थिक संरक्षणही गरजेचे ठरते. हिवाळ्यातील आजारांपासून संरक्षण देणारे आरोग्य विमा कवच कुटुंबासाठी सुरक्षिततेचा आधार बनते.**



आपल्या देशात संसर्गजन्य आजार ही अजूनही मोठी आरोग्य समस्या असून, ती मृत्यूचे एक प्रमुख कारण मानले जाते. या आजारांचे प्रमाण वर्षभर असले, तरी काही विशिष्ट ऋतूंमध्ये त्यांचे प्रमाण सर्वाधिक आढळते. हिवाळा सुरू होताच अनेक संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढते.

हिवाळ्यात श्वसनाच्या संसर्गजन्य आजारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. फ्लू वेगाने पसरतो. न्यूमोनियासारखा आजार गंभीर स्वरूप धारण करून आजारपणाचे आणि मृत्यूचे प्रमुख कारण बनतो. हिवाळ्यात दमा, 'सीओपीडी'; तसेच हृदयविकारासारखे जुने आजारही थंडीमुळे बळावतात. अशा परिस्थितीत आरोग्य विमा महत्त्वाची भूमिका बजावतो. तो प्रतिबंधात्मक उपाय, निदान, उपचार, औषधे, रुग्णालयांत दाखल होण्याचा खर्च, आपत्कालीन उपचार; तसेच हॉस्पिटलमधून सुट्टी मिळाल्यानंतरची काळजी यांचा खर्च कव्हर करतो. यामुळे स्वतःच्या खिशातून होणारा खर्च कमी होतो आणि वेळेवर योग्य उपचार मिळतात.

- **प्रतिबंधात्मक काळजी :** अनेक आरोग्य विमा योजना हिवाळ्याशी संबंधित आरोग्य समस्या लवकरात लवकर शोधण्यास आणि टाळण्यास मदत करण्यासाठी 'कॉम्प्लिमेंटरी अॅन्युअल हेल्थ चेक-अप' आणि काही लसीकरण (अॅन्युअल फ्लू शॉट) आदी संरक्षण प्रदान करतात.
- **टेलिमेडिसिन/व्हर्च्युअल कन्सल्टेशन्स :** आरोग्य विमा योजना 'टेलिकन्सल्टेशन' सुविधा देतात. यामुळे तुम्ही घरबसल्या डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकता. विशेषतः हिवाळ्यात होणाऱ्या किरकोळ आजारांसाठी (सर्दी, खोकला, हलका ताप) ही सुविधा खूप उपयुक्त आहे.
- **ओपीडी संरक्षण :** आरोग्य विमा योजना 'स्टँडर्ड प्लॅन'मध्ये 'ओपीडी'चा लाभ देतात किंवा ते अॅड ऑन स्वरूपात उपलब्ध करून देतात. हिवाळ्यातील फ्लूच्या अनेक रुग्णांना रुग्णालयात दाखल होण्याची आवश्यकता नसते. या लाभामध्ये हॉस्पिटलायझेशनची आवश्यकता नसलेल्या डॉक्टरांचा सल्ला, औषधे आणि मूलभूत निदान चाचण्यांचा खर्च कव्हर केला जातो. त्यामुळे सामान्य फ्लू, सर्दी आणि खोकला यावर होणारा खर्च कमी होतो आणि पैसे वाचतात.
- **रुग्णालयात दाखल होण्याचा खर्च :** हिवाळ्यात होणाऱ्या गंभीर आजारांमध्ये (न्यूमोनिया किंवा फुफ्फुसांशी संबंधित आजार) किंवा तीव्र फ्लू असल्यास रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागते (साधारणपणे २४ तासांपेक्षा जास्त). अशा वेळी आरोग्य विमा रूम भाडे, डॉक्टरांची फी, नर्सिंग शुल्क आणि चाचण्यांचा खर्च संरक्षित करतो.
- **प्री आणि पोस्ट-हॉस्पिटलायझेशन खर्च :** विमा पॉलिसी सामान्यपणे ठरावीक कालावधीसाठी झालेला वैद्यकीय खर्च कव्हर करते. उदाहरणार्थ, हॉस्पिटलायझेशनच्या ३० दिवस आधीचा आणि डिस्चार्जनंतरील ६० ते ९० दिवसांपर्यंतचा खर्च. यामध्ये प्रारंभिक सल्ला, चाचण्या, फॉलो-अप उपचार आणि बरे होत असताना लागणारी औषधे यांचा समावेश होतो.
- **कॅशलेस उपचार :** विमा नियामक 'इर्डा'तर्फे हा लाभ अनिवार्य करण्यात आला आहे. कॅशलेस उपचारांत आपत्कालीन परिस्थितीत हॉस्पिटलमध्ये आगाऊ पैसे भरण्याची काळजी करण्याची गरज नाही. विमा कंपनीचे हॉस्पिटल्सशी करार असतात. विमा कंपनी हॉस्पिटलच्या देयकांसह सर्व खर्चाची हातमिळवणी करते. त्यामुळे मनःशांती मिळते.

हिवाळ्यातील थंडी वाढल्याने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने श्वसनांचे आजार नियंत्रित करण्यासाठी तयारीवर भर दिला आहे. फ्लूसारख्या आजारांवर आणि श्वसनाच्या अन्य गंभीर आजारांवर लक्ष ठेवण्यासाठी 'आयडीएसपी' प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निरीक्षण आणि 'आयसीएमआर' तपासणी व्यवस्थेचा उपयोग करण्यात येत आहे. यावरून हवामानाशी संबंधित आजार किती गंभीर आहेत, हे लक्षात येते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य उपायांव्यतिरिक्त, वैयक्तिक पातळीवरही खबरदारी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. वेळेवर लसीकरण करणे, आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करणे आणि सर्वसमावेशक आरोग्य विमा घेणे आदी उपाय हिवाळ्यातील शारीरिक आरोग्य सुरक्षित राहते; तसेच आर्थिक संरक्षणही मिळते.


**(लेखक बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडचे चीफ टेक्निकल ऑफिसर (कमर्शियल) आहेत.)**